# खोडकिडीच्या बंदोबस्तासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण



शेतकऱ्यांना प्रात्यक्षिक करुन दाखविताना कीटकशास्त्र तज्ज्ञ चव्हाण.

लोकमत न्यूज नेटवर्क

**गोंदिया** : रतनारा येथील शेतकरी राजेंद्र बोरकर यांच्या शेतावर कृषी विज्ञान केंद्र हिवराच्या वतीने कामगंध सापळे लावून खोडकिडींचा वेळेवर बंदबस्त करण्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.

खोडकिडीचे वेळेत बंदोबस्त न केल्यास भातपिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. कामगंध सापळे प्रति एकर चार या प्रमाणात लावावे. त्याकडे खोडकिडीचे नर पतंग आकर्षित होतात व त्यांची प्रजनन क्षमता कमी होवून त्याचा प्रादुर्भाव कमी होतो, असे मार्गदर्शन कीटकशास्त्र तज्ज्ञ आर.डी. चव्हाण यांनी केले.

कामगंध सापळे कमी खर्चिक असल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या परवडणारे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतावर कामगंध सापळ्यांची उभारणी करुन घ्यावी. अधिक माहितीसाठी कृषी विज्ञान केंद्र हिवरा येथे संपर्क साधावा, असे कार्यक्रम समन्वयक डॉ.एन.एस. देखमुख यांनी कळविले आहे.

याप्रसंगी कृषी विज्ञान केंद्राचे मनोज भिमटे, गणेश खेडीकर, सोमनाथ गवते तसेच गावातील महिला-पुरुष शेतकरी उपस्थित होते.